**म.सं.कौ.हिं.का.अर्ज १८/२०२१ मधील नि.५ खालील आदेश**

***CNR : MHSN06002216-2021***

**(स्नेहा पाटील आणि इतर वि. प्रकाश पाटील आणि इतर)**

सदरचा अर्ज अर्जदार हिने जाबदार क्र.०१ यांचेकडून अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केला आहे. दोन्ही पक्षांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला, अभिलेखाची पहाणी केली.

**०२.** सदरच्या अर्जातील कथने व म्हणणे ऐकले. अर्जदार यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. सदरचे खालील मुद्दे माझ्या निर्धारासाठी आले आहेत.

| अ. नं. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१ | अर्जदार हे त्यांच्यावर झालेले घरगुती हिंसाचार शाबीत केले आहे का ? | होय |
| ०२ | अर्जदारास घरगुती हिंसाचार कलम २३ प्रमाणे अंतरिम देखभाल प्राप्त करण्याचा अधिकार आहे की नाही | होय |
| ०३ | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**कारणमिमांसा**

**मुद्दे क्र.०१ ते ०२ करिता –**

**०३.** मुद्दे क्र. ०१ ते ०२ यांचे कारणमिमांसा एकमेकाशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतरित्या विचारात घेतले आहेत. अभिलेखाची पाहाणी केली. सदर कामी अर्जदार क्र.०१ व सामनेवाला क्र.०१ यांच्यामध्ये वैवाहिक संबंध व अर्जदार क्र. ०२ हिच्याशी सामनेवाला क्र.०१ यांचे असलेले नातेसंबंध मान्य केलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सकृतदर्शनी त्या दोघांमधील संबंध असल्याचे दिसून येत आहे. म्हणून अर्जदार ही सामनेवाला क्र.०१ यांच्याकडून पत्नी या नात्याने अंतरिम पोटगी मागण्यास पात्र आहे. अर्जदार व सामनेवाला यांनी परस्परविरोधी कौटुंबिक हिंसाचार केल्याबाबतचे विधान व तक्रार केलेल्या आहेत. परंतू सामनेवाला यांनी सदरच्या अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जदार यांनी केलेले कौटुंबिक हिंसाचाराचे सर्व कथन अमान्य केले आहे. त्यामुळे सामनेवाला यांनी अर्जदारांवर कौटुंबिक हिंसाचार केला का ही बाब सुनावणीअंती निष्कर्ष काढणे मला न्यायोचीत वाटत आहे. कलम २३ नुसार अर्जदार यांनी सकृत दर्शनी बाब सिध्द केली आहे. त्यामुळे अर्जदार ही सामनेवाला क्र. १ यांच्याकडून अंतरिम पोटगी मागण्यास पात्र आहे.

**०४.** सदर कामी अर्जदार क्र. ०१ या पुढे कथन करतात की, जाबदार क्र. ०१ हे पुणे येथे श्रुतभवन संशोधन विभाग, कात्रज येथे क्लर्क म्हणून नोकरीला आहेत. त्यांना पगार रोख र.रु.२५,०००/–(र.रु.पंचवीस हजार मात्र) रुपये पगार मिळतो. तसेच जाबदार यांचे मौजे टाकळी येथे स्वतःचे रहाते घर आहे. जाबदार यांची आर्थिक परिस्थिती चांगली असून जाबदार यांच्यावर अर्जदार हे केवळ अवलंबीत आहेत. अर्जदार व्यतिरिक्त इतर कोणाचीही जबाबदारी जाबदारांवर नाही. म्हणून अर्जदार यांनी दरमहा र. रु.१०,०००/– (र.रु. दहा हजार मात्र) व अर्जदार क्र.०२ साठी दरमहा र.रु. ५,०००/– (र.रु.पाच हजार मात्र) अंतरिम पोटगी देण्याबाबत आदेशीत व्हावे तसेच अर्जदार यांना स्वतंत्र

खोली देण्यात यावी व त्याचे भाडे जाबदार क्र. ०१ यांच्याकडून वसूल करुन देण्यात यावी. जाबदार यांनी सदरचा अर्ज प्रलंबीत असताना अर्जदारास कोणत्याही प्रकारचे मानसिक, शारीरिक व आर्थिक हिंसाचार करु नये असे प्रतिबंधात्मक आदेश पारीत करावा अशी विनंती करतात. याउलट जाबदार क्र. ०१ म्हणणे दाखल करुन कथन करतात की, ते पुणे येथे नोकरीस असून त्यांना दरमहा र.रु.२०,०००/– (र.रु. वीस हजार मात्र)रुपये पगार मिळतो. त्यांच्यावर त्यांच्या वडिलांची जबाबदारी असून ते वडिलांच्या औषधोपचाराचा खर्च करतात. त्यांनी बँकेचे कर्ज काढले असून त्याचे दरमहा हप्ते भरावे लागतात. जाबदार क्र. ०३ हे शेती करतात. सदरची शेती ही ३० गुंठे आहे. ती सामाईक वहिवाटीची आहे. परंतू ती कोरडवाहू शेती आहे. पावसावर अवलंबून असल्यामुळे पिकाचे उत्पन्न येत नाही. याउलट अर्जदार क्र. ०१ यांचे एम.कॉम पर्यंत शिक्षण झालेले असून ती सी.ए. च्या हाताखाली काम करते. तिला दरमहा र.रु. ५०,०००/– (र.रु.पंन्नास हजार मात्र) रुपये उत्पन्न मिळते. अर्जदार यांच्या आई–वडिलांची शेती आहे. त्यापासून दरवर्षी र.रु.५,००,०००/– (र.रु.पाच लाख मात्र) रुपये उत्पन्न मिळते. अर्जदार ही स्वतः कमवत असल्यामुळे ती स्वतःचा सांभाळ करण्यास समर्थ आहे. तिने स्वतःहून जाबदार यांचे घर सोडून गेलेली आहे. त्यामुळे तिला जाबदार क्र.०१ यांच्याकडून पोटगी मागण्याचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नाही. म्हणून सदरचा अर्ज खर्चासह फेटाळावा अशी विनंती करतात.

**०५.** जाबदार क्र. ०१ यांनी ते पुणे येथे नोकरी करत असून त्यांना दरमाहा र.रु. २०,०००/– (र.रु.वीस हजार मात्र) रुपये मिळते ही बाब मान्य केली आहे. याउलट अर्जदार कथन करतात की, जाबदार क्र.०१ यांना रुपये २५,०००/– (र.रु.पंचवीस हजार मात्र) पगार मिळतो परंतू अर्जदार यांनी त्या अनुषंगे कोणतेही कागदपत्र दिले नाही. जाबदार क्र. ०१ यांच्या वडिलांच्या नावे

असलेला ७/१२ उतारा अभिलेखावर दाखल केला आहे. सदर गटनंबर ३०७ च्या ७/१२ सदरी खरीब हंगामी पिके व घरपड अशा नोंदी असल्याचे दिसून येत आहे. जाबदार क्र.०१ हे कथन करतात की, त्यांच्यावर त्यांच्या वडिलांची जबाबदारी असून त्यांनी घेतलेल्या कर्जाचे हप्ते जातात. जाबदार क्र.०१ यांनी कबूल केलेली वस्तुस्थिती लक्षात घेता, तसेच अर्जदार यांची शैक्षणिक पात्रता लक्षात घेता जाबदार क्र. ०१ यांनी अर्जदार यांना दरमहा अंतरिम पोटगी म्हणून अर्ज दाखल केलेल्या तारेखपासून दरमहा अर्जदार क्र.०१ यांना र.रु. ३,०००/– (र.रु.तीन हजार मात्र) व अर्जदार क्र. ०२ यांना र.रु. २,०००/– (र.रु. दोन हजार मात्र) रुपये देणे न्यायोचीत वाटत आहे.

**०६.** जाबदार क्र. ०१ यांनी अर्जदार यांना दरमहा अंतरिम पोटगी म्हणून अर्ज दाखल केलेल्या तारेखपासून दरमहा अर्जदार क्र. ०१ यांना र.रु. ३,०००/– (र.रु.तीन हजार मात्र) व अर्जदार क्र.०२ यांना र.रु. २,०००/–(र.रु. दोन हजार मात्र) रुपये देणे मला न्यायोचीत वाटत आहे. तसेच जाबदार क्र.०१ ते ०४ यांनी सदरचा अर्ज प्रलंबित असताना जाबदार क्र.०१ ते ०४ यांनी अर्जदार यांना कोणत्याही प्रकारचा मानसिक, शारीरिक व आर्थीक हिंसाचार करु नये याबाबत आदेश पारीत करणे मला न्यायोचीत वाटत आहे. म्हणून मुद्दा क्र. ०१ व ०२ हे हाकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र. ०३ करिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** नि.क्र. ०५ चा अर्ज अंशतः मंजूर.

**०२.** जाबदार क्र. ०१ यांनी अर्जदार यांना दरमहा अंतरिम पोटगी म्हणून अर्ज दाखल केलेल्या तारेखपासून दरमहा अर्जदार क्र. ०१ यांना र. रु. ३,०००/– (र.रु.तीन हजार मात्र) व अर्जदार क्र. ०२ यांना

र. रु. २,०००/-(र.रु. दोन हजार मात्र)रुपये द्यावे.

**०३.** सदरचा अर्ज प्रलंबित असताना जाबदार क्र.०१ ते ०४ यांनी अर्जदार यांना कोणत्याही प्रकारचा मानसिक, शारीरिक व आर्थिक हिंसाचार करु नये.

**०४.** अर्जदाराला सदरच्या आदेशाची प्रत मोफत देणेत यावी.

**०५.** सदर आदेशाची प्रत संरक्षक अधिकाऱ्यास पाठवावी.

MAHADEVI SHIVARAJ MANAGULI
Digitally signed by MAHADEVI SHIVARAJ MANAGULI
Date: 2023.01.18 12:44:11 +0530

(श्रीमती एम. एस. मनगुळी)

दि.१८.०१.२०२३ तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same, word to word, as per the original Order.

Name of the Stenographer: Smt. S.P.Patil
Name of the Court : Smt. M. S. Manguli,
3rd Jt. Civil Judge J.D. & J.M.F.C., Miraj.
Date of Decision : 18/01/2023
Order signed by
the presiding officer on : 18/01/2023
**Order uploaded on : 18/01/2023**